N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** बेगमपूरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0227 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 27/07/2026 15:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिंनाक पासून):** 11/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 11/03/2026
**Time From (वेळेपासून):** 18:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 27/07/2026 **Time (वेळ):** 15:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 27/07/2026 15:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): शांतीलाल देविदास चव्हाण

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,बेगमपूरा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,बेगमपूरा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8888390777

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.चंद्रकांत हनुमंत कामठे | | | 1. श्रीस्वामी समर्थ मंदीर शेजारी,, फलट नं02, पहिला मजला, श्रीस्,सातारा परीसर छत्रपती संभाजीनगर,बेगमपूरा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिंयाद दिंनाक 27/07/2026.

मी शांतीलाल देविदास चव्हाण, वय 43 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक-लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 8888390777.
मी वरील प्रमाणे असून सरकारतर्फे फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे मागील दिड वर्षापासुन पोलीस निरीक्षक म्हणुन काम करतो. यातील मुळ तक्रारदार गोरख मानसिंग चव्हाण, वय 60 वर्षे, व्यवसाय-वकीली, सेवानिवृत्त (PSI) रा.जटवाडा रोड, एकतानगर, हर्सुल जेलच्या मागे, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.27/02/2026 रोजी आमचेशी संपर्क साधुन छत्रपती संभाजीनगर येथे एका सुरक्षीत ठिकाणी हजर येवुन दोन शासकिय पंच व आमचे समक्ष त्यांचेकडे होत असलेल्या लाचमागणी बाबत प्रथम तोंडी तक्रार सांगिंतल्यानतर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.
" गोरख मानसिंग चव्हाण, वय 60 वर्षे, व्यवसाय-वकीली, सेवानिवृत्त(PSI) रा.जटवाडा रोड, एकतानगर, हर्सुल जेलच्या मागे, छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9923656666.
आज दिंनाक 27/02/2026 रोजी सांस्कृतीक मैदान परिसर छत्रपती संभाजीनगर येथे एका सुरक्षीत ठिकाणी हजर येऊन तक्रार देतो की, मी वर नमुद ठिकाणी राहणार आहे. मी एक सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक असुन सध्या जिल्हा कोर्ट छत्रपती संभाजीनगर येथे वकिली व्यवसाय करतो.
मी व माझे मित्र यासीन खान महेमुद खान असे आमची सन 2024 मध्ये इसम नामे श्री. शेख ईरफान शेख शफीक, रा.सलमान हॉल, दिल्ली गेट छत्रपती संभाजीनगर व इतर 5 लोकांनी संगनमताने कट रचुन त्यांचे नावे असलेल्या तसेच दुसऱ्यांचे नावे असलेल्या चाऊस कॉलनी, हिमायत बाग, छत्रपती संभाजीनगर गट क्र.19/1 मधील 18.7 आर ही जमीन दाखवून सदर मालमत्तेचे जी.पी.ए., ईसार पावती, समजुती करारनामा, खरेदीखत आमचे नावे करुन आमचा विश्वास संपादन करुन आमचे कडून रोख व आरटीजीएस व्दारे 1,33,00,000/-रुपये घेवुन आमची आर्थिक फसवणुक केली आहे. त्याने सदरची जमीन आमचे नावे करण्याकरिता टाळाटाळ करण्यास सुरवात केली. आमची फसवणुक केल्याचे आमच्या लक्षात आल्याने मी पोलीस स्टेशन सिटीचौक येथे सर्व पुराव्यानिशी संबंधितावर फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा या करिता तक्रारी अर्ज केला होता. मी दिलेल्या तक्रार अर्जावर पोलीस स्टेशन सिटीचौक यांनी कसलीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे मी पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर शहर येथील आर्थिक गुन्हे शाखा येथे सबंधीत व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्या बाबत सर्व पुराव्यासह तक्रारी अर्ज केला. सदर अर्ज चौकशीत आर्थिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक श्री.कामठे यांनी मला व माझे मित्र यासीन खान यांना आर्थिक गुन्हे शाखा कार्यालयास बोलावले त्या ठिकाणी पीएसआय श्री.कामठे म्हणाले की, तुमच्या तक्रारी अर्जाची लवकरात लवकर चौकशी करुन श्री.इरफान शेख व त्याचे साथीदार यांचेवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करू तसेच गुन्हयातील सर्व व्यक्तींना अटक करुन त्यांची जामिन होणार नाही यासाठी प्रयत्न करु तुम्हाला सदर गुन्हयात मदत करु. त्या करिता मला 50,000/- रुपये दयावे लागतील. त्यावर मी श्री.कामठे यांना म्हणालो की, साहेब आमचीच फसवणुक झाली आहे आता एवढी रक्कम देणे शक्य नाही त्यावर श्री.कामठे म्हणाले की, सदर रक्कमेतून मला पोलीस निरीक्षक श्री.पवार यांना देखील रक्कम दयावी लागते व गुन्हा दाखल झाल्याशिवाय तुम्हाला तुमची रक्कमही परत मिळणार नाही ते असे म्हणाल्याने मी नाविलाजाने त्यांना हो म्हणालो व आपण पहिले गुन्हा दाखल करा गुन्हा दाखल केल्यानंतर मी आपणास येवुन भेटतो असे म्हणुन तेथुन निघुन आलो आहे.

थांबल्या ठिकाणी परत आले त्यावेळी पंच क्र.2 यांचे समक्ष पंच क्रं.1 नरवडे यांना तुम्ही सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणापासुन रवाना होवुन ते सदर ठिकाणी परत येई पर्यंत काय घटना घडली या बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार गोरख मानसिंग चव्हाण असे आर्थिक गुन्हे शाखा पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे तक्रारदार यांचे खाजगी चारचाकी वाहनाने गेलो. पौलीस आयुक्त कार्यालयाचे ईमारती मध्ये आर्थिक गुन्हे शाखाचे कार्यालयात जात असतांनाच एक व्यक्ती तक्रारदार यांना भेटुन बोलले त्यावेळी तक्रारदार यांचे ईशाऱ्याने सदर व्यक्ती हे पोलीस उपनिरीक्षक श्री. कामठे असल्याचे मला समजले सदर व्यक्ती तक्रारदार यांचेशी बोलून बाहेर निघुन गेली त्यानंतर तक्रारदार कार्यालयातील ईतर दोन तिन व्यक्तींशी भेटुन त्यांचे प्रकरणा बाबत चर्चा करत राहिले. थोडयावेळाने पोउपनि श्री.कामठे हे आर्थिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात परत आले. त्यानंतर तक्रारदार यांची पोउपनि कामठे यांचेशी कामानिमीत्त चर्चा झाली. सदर चर्चेवेळी तक्रारदार हे पोउपनी कामठे यांना म्हणाले की,-चला तिकड जावु ना मंग,, कस करायच मंग त्यावेळी श्री. कामठे हे म्हणाले की, तुम्ही सांगा त्यावर तक्रारदार म्हणाले की -दहा पंधरा दिवसान दिल तर चालन ना, त्यावेळी श्री. कामठे म्हणाले की - एवढ कुठ हे,, दहा पंधरा दिवसान द्यायला, त्यावर तक्रारदार म्हणाले की - थोड, त्याच ते यासीन पण याच्यात आहे ना, त्यावेळी श्री. कामठे म्हणाले की- त्याला म्हणा पन्नास, काय लय आहे होय तेव्हा,त्यावर तक्रारदार म्हणाले की - पन्नास तुमच्यासाठी जास्त नाही, पण आमच्यासाठी जास्त आहे ना, त्यावेळी श्री.कामठे म्हणाले की- कहयाचे जास्त आहे त्यावर तक्रारदार म्हणाले की- रिटायर माणुस आहे साहेब, त्यावेळी श्री.कामठे म्हणाले की- एक कोटी तिस-तिस लाखाच्या जागा घेतात, पन्नास कमी होतात,, लय होताय होय,, असे बोलुन पन्नास हजार रुपयाची मागणी केली. त्यावेळी पो.नि.पवार हे बंदोबस्तात असल्याने ते उदया दुपारनंतर भेटु असे श्री.कामठे म्हणाले. त्यानंतर आम्ही सुरक्षीत ठिकाणी परत आलो."अशी हकीकत सांगितली.
त्यानंतर आम्ही पंच क्र.2 श्री. रोहिदास म्हस्के यांचे समक्ष मुळ तक्रारदार गोरख चव्हाण यांचेकडे ते सुरक्षीत ठिकाणावरुन रवाना झाले ते परत सुरक्षीत ठिकाणी येणे पर्यंत काय झाले या बाबत विचारणा केली त्यांनीही पंच क्र. 1 यांचे सांगणे प्रमाणे तोंडी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये पोलीस उप निरीक्षक श्री. कामठे यांनी मुळ तक्रारदार गोरख चव्हाण यांचेकडे त्यांचे तक्रार अर्जावरुन फसवणुकीचा गुन्हा दाखल केला, आरोपीस अटक केली व गुन्हयात मदत करतो म्हणून 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

लाचमागणी वेळी पोलीस निरीक्षक श्री.पवार यांची प्रत्यक्षात भेट झाली नसल्याने दोन्ही पंच, तक्रारदार व आम्हा सर्वांचे मते उदया दिंनाक 12/03/2026 रोजी श्री.पवार पोलीस निरीक्षक यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निंणय घेण्यात आला.
त्यानुसार दिंनाक 12/03/2026 रोजी मी कार्यालयीन वेळेत ला.प्र.वि.कार्यालय छ.संभाजीनगर येथे दोन्ही पंच व सापळा पथक हजर आले. दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सोबत घेवुन आम्ही सुरक्षीत ठिकाणाकडे रवाना झालो. सुरक्षीत ठिकाणी पोहचल्या नंतर सदर ठिकाणी तक्रारदार श्री.गोरख चव्हाण हे हजर आले. त्यानंतर आम्ही दिंनाक 11/03/2026 रोजी ठरल्यानुसार पो.नि.श्री.पवार यांची लाचमागणी पडताळणी करणे असल्याचे सांगितले. तसेच पंचाना व तक्रारदार यांना लाचमागणी पडताळणी संदर्भात सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही असा ठेवुन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.प्रविण नरवडे असे सुरक्षीत ठिकाणावरुन चारचाकी वाहनामध्ये बसुन आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे पो.नि.श्री.पवार यांचे भेट घेणे कामी दिंनाक 12/03/2026 रोजी 16.28 वाजता रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 असे सुमारे 16.46 वाजता पथक थांबलेल्या सूरक्षीत ठिकाणी परत आले. तेथे पोहं/काळे यांनी तक्रारदार यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन तो बंद करुन आमचे ताब्यात दिला. त्यानंतर आम्ही पंच क्रं.2 रोहिदास म्हस्के यांचे समक्ष पंच क्रं.1 नरवडे यांना ते व तक्रारदार असे सुरक्षीत ठिकाणवरुन गेल्यापासुन ते परत येईपर्यंत काय घडले? याबाबत विचारले असता पंच क्र.1 नरवडे यांनी खालील प्रमाणे हकीकत सांगितली.-
"मी, तक्रारदार असे त्यांचे चारचाकी वाहनाने सुरक्षीत ठिकाणाहुन आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर (शहर) कडे 16.28 वाजता निघालो. त्यानंतर आम्ही आर्थिक गुन्हे शाखा कार्यालयात पोहचलो आर्थिक गुन्हे शाखा कार्यालयात तक्रारदार यांची दोन ते तिन व्यक्तींशी भेट झाली सदर भेटी मध्ये तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दाखल झालेल्या गुन्हे तपासा संदर्भात चर्चा झाली चर्चा दरम्यान तक्रारदार यांना समजले की, लोकसेवक श्री. कामठे, पोलीस उप निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा हे जवाहरनगर येथे कामानिमित्ताने गेलेले आहे. तसेच पी.आय.साहेब देखील मिटींग मध्ये आहे. त्यामुळे आज रोजी लोकसेवक श्री. कामठे यांची भेट होणार नाही.

पोलीस स्टेशन बेगमपुरा छत्रपती संभाजीनगर (शहर)



असे लक्षात आल्याने तक्रारदार व मी कार्यालयातुन बाहेर आलो. त्यानंतर तक्रारदार यांचे वाहनाने सुरक्षीत ठिकाणी परत आलो आहे. सदर ठिकाणी पो.ह. काळे यांनी तक्रारदार यांचेकडे असलेला व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन आमचे ताब्यात दिला. ती वेळ सुमारे 16.46 वाजेची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना ते व पंच क्रं.1 श्री. नरवडे असे सुरक्षीत ठिकाणावरुन गेल्यापासुन ते परत सुरक्षीत ठिकाणी येण्यापर्यंत काय घटना घडली असे विचारले असता त्यांनी पंच क्रं. 1 श्री. नरवडे यांनी कथन केलेल्या हकीगती प्रमाणे हकीगत सांगितली. अभिकथीत लोकसेवक यांची भेट न झाल्यामुळे तक्रारदार दोन्ही पंच व आम्ही सर्वानुमते सर्व संमतीने दिंनाक 12/03/2026 रोजी लाचमागणी पडताळणी कारवाई स्थगित करण्याचा निणय घेतला तसेच तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना सदर प्रकरणात गोपनियता बाळगुन यांची कोठेही चर्चा करु नये या बाबत सुचना दिल्या आहे. तसा लाचमागणी पडताळणी स्थगिती कारवाईचा सविस्तर पंचनामा तयार करण्यात आला आहे.
त्यानंतर दिंनाक 24/07/2026 रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. कार्यालय येथे समक्ष हजर येवुन लेखी जबाब दिला की, ते त्यांचे फिंयादीवरुन पो.स्टे. सिटीचौक येथे दाखल गु.र.नं. 69/2026 कलम 406, 420, 467, 468, 471, 506, 120 (ब), 34 भा.दं.सं. 1960 मध्ये काय तपास झाला? आरोपी अटक झाले की नाही? त्यांची फसवणुक झालेल्या रक्कमे चे काय झाले ? ईत्यादी कारणांची विचारपुस करण्याकरिता बऱ्याचदा आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर शहर येथे गेले सदर वेळी पोलीस निरीक्षक श्री.पवार व पोलीस उपनिरीक्षक श्री. कामठे यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांना समजले की, पोलीस निरीक्षक श्री.पवार यांची सदर ठिकाणाहून बदली झालेली आहे तसेच पोउपनि श्री. कामठे यांनी टाळा-टाळ करुन तक्रारदार यांची भेट घेतली नाही. तसेच तक्रारदार यांनी वेळोवेळी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांना कसलाही प्रतिसाद दिला नाही. तसेच पोलीस उपनिरीक्षक श्री. कामठे यांनी मागणी केलेली 50,000/- रुपये लाचेची रक्कम घेणे बाबत तक्रारदार यांचेशी संपर्क केला नाही. यावरुन पोलीस उपनिरीक्षक-श्री.कामठे यांना तक्रारदार यांचेवर काहीतरी संशय आला असावा व त्यामुळे ते आता दिंनाक 11/03/2026 रोजी पंचासमक्ष मागणी केलेली 50,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी असे आमचे समक्ष लेखी जबाब दिला आहे.
तरी लोकसेवक श्री.कामठे, नेमणुक आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (शहर) यांनी मुळ तक्रारदार श्री गोरख चव्हाण यांचेकडे त्यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरुन गैर अर्जदार यांचेवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी तसेच स्वत:चा वैयक्तिक प्रभाव पाडुन गुन्हयातील आरोपी अटक करण्याचे सांगून सदर गुन्हयात मदत करण्यासाठी दिंनाक 11/03/2026 रोजी 18.10 ते 18.49 वाजे दरम्यान आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर शहर येथे पंच क्र. 1 यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. नमुद लोकसेवक श्री.कामठे, पोलीस उपनिरीक्षक यांनी त्यांना दिलेल्या अधिकारानुसार शासकीय नियत कायदेशिर काम नियमाप्रमाणे करण्याची त्यांची जबाबदारी असतांना त्यांनी त्यांचे शासकीय कायदेशिर काम करण्यांसाठी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा वैयक्तिक प्रभाव पाडून सांपत्तीक फायदा करण्यासाठी कायदेशिर परिश्रमाखेरीज अन्य परितोषण म्हणुन गैर लाभ मिळविण्याचे उद्येशाने तक्रारदार श्री.गोरख चव्हाण यांचेकडे 50,000/-रुपये लाचेची मागणी केली आहे. म्हणुन माझी श्री. चंद्रकांत हनुमंत कामठे, वय-38 वर्ष, व्यवसाय नौकरी- पद पोलीस उप निरीक्षक, नेम.आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (वर्ग-2) रा. फलॅट नं.02, पहिला मजला, श्रीस्वामी समर्थ मंदीर शेजारी, सातारा परीसर छत्रपती संभाजीनगर मुळ रा.मु.पो.चांबळी, ता.पुरंदर, जि.पुणे यांचेविरुद भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनीयम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

हि फिंयाद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINA TARACHAND YADAV(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्युटी ऑफीसर
पो स्टेशन बेगमपुरा
छत्रपती संभाजीनगर (शहर)

पोलीस स्टेशन बेगमपुरा छत्रपती संभाजीनगर (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVINA TARACHAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI